॥ ॐ ॥

डिसेंबर
२०२२

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org

## कै. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन

संस्थापक – ‘स्व’-रूपवर्धिनी

जन्मतिथी : दत्तजयंती
जन्म दिनांक : २५ डिसेंबर, १९२०



*प्रभो तू चिदानंदरूपी असोनी*
*अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।*
*तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे*
*पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।*
*पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास देऊ*
*प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥*

# शाखा विभाग





● **अभ्यास कौशल्ये विकास शिबिर** - दि. ३ व ४ डिसेंबरला ८ वी ते १० वी च्या वर्धक-वर्धिकांचे अभ्यास कौशल्ये, अभ्यासाचे व स्वत:चे दैनंदिन नियोजन तसेच पाठ्यक्रमातील गणित, विज्ञान, इंग्रजी आणि इतिहास या विषयांवर अभ्यास शिबिर संपन्न झाले. १४० विद्यार्थ्यांनी यात सहभागी झाले. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी या शिबिराचा नक्कीच उपयोग होईल.






● **क्रीडादिन** - यावर्षीचा वर्धक विभागाचा क्रीडादिन दि. १३ व २० नोव्हेंबर तर वर्धिका विभागाचा दि. २७ नोव्हेंबरला पार पडला. वर्धक विभागाच्या क्रीडादिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रणजीत चामले (स. प. महाविद्यालय, क्रीडा विभाग प्रमुख) तर वर्धिका विभागाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. विनेश नगरे उपस्थित होते. वैयक्तिक आणि सांघिक प्रकारात सर्वच वर्धक-वर्धिका आणि युवा कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. यातील बक्षीसप्राप्त वर्धक-

● **१०० मी. धावणे** - लहान गट (५ वी, ६ वी) : प्रथम - गणेश जकनाळे, द्वितीय - दिनेश डोंगरे, तृतीय - अवनीश तांबे

मध्यम गट (७ वी, ८ वी) : प्रथम - गणेश सुर्यवंशी, द्वितीय - सिद्धार्थ लेणे, तृतीय - निलेश चव्हाण

मोठा गट (९ वी, १० वी) : प्रथम - मयुर खरात, द्वितीय - साहिल खान, तृतीय - साजिद खान

युवक गट (११ वी, १२ वी) : प्रथम - पिनाक पाळे, द्वितीय - गणेश मते, तृतीय - पियुष उभे

युवक गट (F.Y. ते T.Y.) : प्रथम - साहिल माने, द्वितीय - मयुर राणे, तृतीय - ओंकार पंडीत

युवक गट (व्यावसायिक) : प्रथम - अमित अदवडे, द्वितीय - चेतन सिंग, तृतीय - सोहम महाजन

● **१६०० मी. धावणे** - लहान गट : प्रथम - ओम पोकळे, द्वितीय - शैलेश चव्हाण, तृतीय - पार्थ साळवी,

मध्यम गट : प्रथम - आदर्श गायकवाड, द्वितीय - सुमीत घाणेकर, तृतीय - समर्थ राजमाने,

मोठा गट (९ वी, १० वी) : प्रथम - सौरभ शिंदे, द्वितीय - सार्थक फाळे, तृतीय - तेजस पाष्टे,

युवक गट (११ वी, १२ वी) : प्रथम - रोहन मरगळे, द्वितीय - ऋषिकेश शिंदे, तृतीय - गौरव सुतार,

युवक गट (F.Y. ते T.Y.) : प्रथम - श्रेयस खंडाळे, द्वितीय - शाहीद शेख, तृतीय - ओमकार जाधव,

युवक गट (व्यावसायिक) : प्रथम - अतुल बिबवे, द्वितीय - समर्थ बोराडे, तृतीय - शुभम शिंदे

● **लांब उडी** - लहान गट (५ वी, ६ वी) : प्रथम - गणेश नंदगिरी, द्वितीय - गणेश जकनाले, तृतीय - वेदांत धाडीवाले

मध्यम गट (७ वी, ८ वी) : प्रथम - गणेश सूर्यवंशी, द्वितीय - आर्यन तनपुरे, तृतीय - आयुष तांदळे

मोठा गट (९ वी, १० वी) : प्रथम - साहिल खान, द्वितीय - सौरभ शिंदे, तृतीय - समर्थ पवार

युवक गट (११ वी, १२ वी) : प्रथम - गणेश मन्ने, द्वितीय - संचित पवार, तृतीय - रोहन मरगळे

युवक गट (F.Y. ते T.Y.) : प्रथम - शाहीद शेख, द्वितीय - जय वाडेकर, तृतीय - आदित्य घोरपडे

● **समता (सांघिक स्पर्धा) विजेते** - (१) स्वामी दयानंद शाखा (२) स्वामी ब्रह्मानंद शाखा

● **लंगडी सांघिक स्पर्धा विजेते** - लहान गट - स्वामी ब्रह्मानंद शाखा (विजेता), राजर्षी शाहू शाखा (उपविजेता)

● **कबड्डी सांघिक स्पर्धा विजेते** - मोठा गट - राजर्षी शाहू शाखा (विजेता), स्वामी योगानंद शाखा (उपविजेता),

युवक (११ वी, १२ वी) - स्वामी दयानंद शाखा (विजेता), स्वामी ब्रह्मानंद शाखा (उपविजेता)

● **फुटबॉल सांघिक स्पर्धा विजेते** - युवक गट (F.Y. ते T.Y.) - स्वामी दयानंद शाखा (विजेता),

स्वामी ब्रह्मानंद शाखा + राजर्षी शाहू शाखा (उपविजेता)

● **व्हॉलीबॉल स्पर्धा विजेते** - व्यावसायिक - स्वामी दयानंद शाखा (विजेता), स्वामी श्रद्धानंद शाखा (उपविजेता)



● **वर्धिका विभाग - १०० मी. धावणे** - सिद्धी गुळांबे - प्रथम, वेदिका झांजे - द्वितीय,

● **दोरी उड्या** - श्रावणी मोरे, संजना बिराजदार - प्रथम, तन्वी कात्रे - तृतीय,



● **सीटअप्स** - संजना बिराजदार - प्रथम, श्रावणी मोरे - द्वितीय, सिद्धी गुळांबे - तृतीय,
● **अडथळा शर्यत** - विजेते - तन्वी कात्रे, श्रावणी मोरे, सुश्मिता स्वामी, नेहा परदेशी
● **युवती गट - सीटअप्स** - चंचल ओबी, प्रज्ञा कोकीळ, वैष्णवी रायकर,
● **दोरी उड्या** - पायल जिरेसाळ, वैष्णवी रायकर,
● **अडथळा शर्यत** - चंचल ओबी, गायत्री मोरे, पायल जिरेसाळ

## उत्थान विभाग

विभागाचा वार्षिक क्रीडा दिन दि. २० नोव्हेंबरला ढोले पाटील शाळा, कोरेगाव पार्क येथे तर व दि. २७ नोव्हेंबरला श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला, भवानी पेठ, पुणे येथे संपन्न झाला. विभागाचे पालक श्री. संदीप मोरे यांच्या हस्ते उद्घाटन आणि बक्षीस वितरण करण्यात आले.

● **लंगडी सांघिक विजेते** - * प्रथम क्रमांक - भीमरत्न अभ्यासिका, * द्वितीय क्रमांक - डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अभ्यासिका, * तृतीय क्रमांक - प्रियदर्शनी अभ्यासिका











श्रीरामाचा आदर्श, रामकृष्ण, विवेकानंद आणि शाहुंचे विचार यांनी प्रेरित झालेले वर्धिनीचे सेवेकरी म्हणजेच व्यावसायिक युवक, 'प्रेरणा करंडक २०२२' च्या निमित्ताने ४ डिसेंबरला सर्वजण एकत्र जमले. रीतसर शाखा भरवून करंडक प्रमुख अशोक इंगवले यांनी व्हॉलीबॉल सामन्यांना सुरूवात करून दिली. आपण खेळासाठी एकत्र येत नाही तर एकत्र येण्यासाठी खेळतो याची प्रचिती देत जवळपास ८ संघ स्पर्धेत चुरशीने खेळत होते. जुन्या आठवणींना उजाळा देत एकमेकांची मस्करी करत पण तरीही खेळीमेळीच्या शिस्तबद्ध वातावरणात सामने रंगले. प्रेरणा करंडकाच्या निमित्ताने दररोजच्या व्यस्त दिनक्रमातून अनेक युवक आले, खेळले, रमले आणि खरंतर सगळेच जिंकले.

- **सचिन सनगरे** (प्रेरणा शाखा प्रमुख)

# पाकोळी बालवाडी



• **बालमेळावा –**
विभागाच्या वार्षिक उपक्रमांपैकी एक अतिशय महत्त्वाचा उपक्रम म्हणजे बालमेळावा. यावर्षी दि. २ डिसेंबरला डॉ. नीला धडफळे यांच्या हस्ते बालमेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. जीवन व्यवहार, कला, क्रीडा, कौशल्ये, खेळ, भाषा विकास, गणित व विज्ञानाची ओळख अशा विषयांवर आधारित उपक्रम आणि शैक्षणिक साधनांची मांडणी वेगवेगळ्या वर्गांमध्ये करण्यात आली. परिसरातील शाळा, पालक, विद्यार्थी, हितचिंतक अशा अनेकांनी दिवसभर चाललेल्या या उपक्रमाला भेटी दिल्या. बालमेळाव्याला भेट देण्यासाठी आलेल्या बालवाडीपासून पूर्व-प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी वरील सर्व विषयांच्या उपक्रमांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. विशेष म्हणजे बालवाडीच्या पालकांनी पूर्वतयारी करून अनेक साधनांची ओळख आलेल्या विद्यार्थ्यांना करून देण्यामध्ये उत्साहाने सहभाग घेतला.









# समुपदेशन विभाग

• १ ऑक्टोबरला डॉ. सौ. मनिषा नारकर यांनी पालकत्व निभावताना 'आजची आधुनिक माता' या विषयावर ऑनलाईन माध्यमातून पालकांशी संवाद साधला. करियर, घर, मूल अशी तारेवरची कसरत करताना घ्यावयाची काळजी, मुलांना वेळ देणं, मुलांशी संवाद साधणं या आयामांवर ताईंनी संवाद साधला.

• २६ नोव्हेंबरला क्रांतीज्योती सावित्री शाखेवर श्री. योगेश तांबट यांनी 'वेळेचे महत्त्व' या विषयावर वर्धिकांशी संवाद साधला. विभागातर्फे हुजुरपागा शाळेतील जवळपास ३५० विद्यार्थिनींसाठी सौ. मेघा नगरे यांनी 'पंचकोश' या विषयावर पाच दिवसांची कार्यशाळा घेतली.

• वर्धिनीच्या सर्व विभागातील कार्यकर्त्यांसाठी समुपदेशन विभागाने 'सेल्फ मॅनेजमेंट फॉर बेटर परफॉर्मन्स' या विषयावर डॉ. अनघाताई लवळेकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले. स्वतःचे व्यवस्थापन, स्वतःमध्ये असणाऱ्या कौशल्यांचा विकास, आपल्या ध्येयाबाबतची स्पष्टता, आत्मविश्वासाचे महत्त्व, बदलांशी जुळवून घेण्याची क्षमता अशा अनेक पैलूंवर अनघाताईंनी उपस्थितांशी विविध उहरणांद्वारे संवाद साधला.

समुपदेशन क्षेत्रात गेली १० वर्षांहून अधिक काळ कार्यरत असल्याने वर्धिनीच्या कार्यकर्त्या सौ. मेघा नगरे यांचा सत्कार ‘दादाची शाळा’ या संस्थेतर्फे करण्यात आला.
**वर्धिनी परिवारातर्फे अभिनंदन.**

# रुग्ण सहाय्यक वर्ग

सुखदुःखाच्या झुल्यावरती, आयुष्याचा सजे सोहळा । कधी सुखद गारवा, कधी पोळतो उन्हाळा ।।

**कुंदन प्रक्षाळे,** रुग्ण सहाय्यक वर्गाचा माजी विद्यार्थी. अगदी लहान म्हणजे कळत नसलेल्या वयामध्ये त्याच्या आई-वडिलांचे निधन झाले होते. परमेश्वर जसे दुःखाचे दान देतो तसे वेगळ्या रुपात मदतीलाही उभा राहतो. आईने वीस वर्षांपूर्वी ज्या हॉस्पिटलमध्ये शेवटचा श्वास घेतला होता त्याच हॉस्पिटलमधील एका डॉक्टरांनी ह्या तिघा भाऊ बहिणींना वेगवेगळ्या चांगल्या संस्थेत दाखल केले. कुंदनला वंचित विकास संस्थेत, त्याच्या लहान भावाला येरवडा येथील संस्थेत तर छोट्या बहिणीला मानव्य गोकुळ संस्थेत या डॉक्टरांनी दाखल केले. दहावी परीक्षा पास झाल्यानंतर वंचित विकास संस्थेने कुंदनला आग्रहाने ‘स्व’-रूपवर्धिनीत सुरू असलेला नर्सिंग कोर्स करण्यासाठी पाठवले. खूप मेहनत करून वर्धिनीतील अभ्यासक्रम त्याने उत्तम यश मिळवून पूर्ण केला. या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून कुंदन धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये प्रात्यक्षिक करण्यासाठी जायचा. त्याच्या वागण्या-बोलण्यातून रुग्णालयातील डॉक्टर, स्टाफ यांना वर्धिनीचे संस्कार जाणवायचे. रुग्णांना खुलवण्याची हातोटी फारच थोड्यांना जमते. कुंदनकडे ती होती. त्याचा सहवास, त्याचे बोलणे, धुपाच्या गंधाप्रमाणे नेहमी सुगंधाने भारलेले असायचे. त्यामुळेच अभ्यासक्रम पूर्ण होताच धन्वंतरी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी त्याला कामावर रुजू होण्यास सांगितले. ही नोकरी करता करता तो बारावी सायन्सची परीक्षा उत्तीर्ण झाला. हॉस्पिटलमध्ये एका पेशंटने त्याची विचारपूस करताना त्याला बी.एस्सी. करण्याचा सल्ला दिला आणि त्या संदर्भात आवश्यक ती सर्व मदतही देऊ केली. या मदतीच्या आधारावर कुंदनने बीएस्सी अभ्यासक्रमासाठी लीलाबाई ठाकूर कॉलेज ऑफ नर्सिंग येथे प्रवेश घेतला. जॉब करून पैशाची उभारणी करणे शक्य नव्हते म्हणून त्याने एका ब्यूरोमध्ये कॉल घेण्याचे काम स्वीकारले. कष्टाची नोकरी, नियमित अभ्यास याच्या बळावर त्याने बीएस्सी. नर्सिंगचे शिक्षण पूर्ण केले. आता तो Iris Healthcare Clinic & Diagnostics Center, Baner येथे नोकरी करत आहे. कुंदन म्हणतो, ‘वर्धिनीमुळे माझे हरवलेले घर मला पुन्हा मिळाले. माझ्या प्रगतीचा रस्ता वर्धिनीमुळे खुला झाला.’

**- शब्दांकन : सुनीता गंगावणे**